दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०४६/२०१७-१८
दि.०६/०४/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ...............अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचेकडे दि.२६/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) कृपया मला दि.२२/०२/२०१८ सकाळी ११.३० वाजता पासून रात्री २०.४५ वाजेपर्यंतची मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पहिल्या मजल्यावर सामान्य प्रशासन जवळ असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेराच्या फुटेज, सी.डी. मध्ये किंवा माझ्या पेन ड्राईव्ह मध्ये नि:शुल्क देण्यात यावे.
नोट:- सी.डी. (DVD) चे अधिकृत फी (चार्ज) मी भरायला तयार आहोत, त्यामुळे या अर्जासोबत सी.डी. चे रु.४०/- ची पावती जोडत आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१७/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.सी.सी.टीव्ही/२५३/२०१८ दि.१९/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२६/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती अधिकार अधिनियमातील २००५ अंतर्गत कलम ८ (जी) मधील तरतुदीनुसार माहिती देण्याची आवश्यकता नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) अपिलार्थी अर्जदार यांनी सादर केलेल्या केंद्र माहितीचा अधिकार, नवी दिल्ली फाईल क्र.CIC/VS/A/2013/000889SH, दि.२३/०५/२०१४ च्या निर्णयाचे व अपिल क्र.केआर-२००७/२०१५ दि.२२/०२/२०१६ च्या निर्णयाचे अवलोकन करणे बाबत विधी अधिकारी यांना लेखी पत्र देऊन अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

O/C
०३/४/१८

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा)

करिता
परिपत्रक
०/४/२०१८

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचे कार्यालय.